CMYK

बीड । सोमवार

२६.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ५५

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१










# छगन भुजबळ मंत्रिमंडळात, मनोज जरांगे पुन्हा मैदानात

## आरक्षण घेतल्याशिवाय आता माघार नाही

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा एल्गार करण्याची तयारी दाखवली आहे. देवेंद्र फडणवीस याला सरकार वाचवायचे आहे. पण मला माझे मराठा वाचवायचे आहे. वेळ पडली तर जीव गेला तरी चालेल पण समाजाशी गद्दारी करणार नाही.

तुमच्या लेकरा बाळांसाठी आंदोलन करत आहे. ते मोठे झाले पाहिजे. यासाठी मी शत्रूत्व घेतलं आहे. उपोषणामुळे माझं शरीर मला साथ देत नाही, पण अर्धवट आंदोलन करून मरणार नाही. मराठ्यांना आरक्षण देऊनच मी मरणार, असा निर्धार मनोज जरांगेनी व्यक्त केला आहे.

मराठा आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन करणार असल्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. ते म्हणाले की आता विजयाचा गुलाल घेऊनच मुंबईतून परतायचे. दहा ते बारा दिवसांची तयारी ठेवून मराठा बांधवांनी मुंबईकडे कुच करायचे आहे. मुंबईत एकाही मराठा बांधवाला काठी लागली किंवा त्यांच्या गाडीला काही झाले तर आमदारांचा कार्यक्रमच करणार असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर गेल्या काही वर्षापासून मनोज जरांगे आंदोलन करत आहेत. आज त्यांनी जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील महाकाळ येथे गोदाकाठच्या १२३ गावांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी मराठा समाजाला मुंबईला जाण्याची तयारी ठेवा असे आवाहन केले. येत्या २९ ऑगस्टला मुंबईत जाण्याची तयारी करा, आजपासूनच तयारीला लागा असे आवाहन त्यांनी केले. मनोज जरांगे म्हणाले की फडणवीसांनी आता दंगली घडवण्याचे डोक्यातून काढून टाकावे. भुजबळांनी मराठा आरक्षणाला विरोध केला तर त्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही. देवेंद्र फडणवीस गुप्तपणे डाव टाकत आहे, असे मला मंत्री आणि अधिकारी सांगतात असाही आरोप जरांगेनी यावेळी केला.

छगन भुजबळ यांच्या मंत्रिमंडळ समावेशानंतर मनोज जरांगे यांनी आंदोलनाची तयारी केली आहे, हे विशेष. मनोज जरांगे म्हणाले की, फडणवीस हे उगन भुजबळच्या आड ओबीसी मराठा वाद लावून देण्याचे काम करत आहे. फडणवीसांनी अंतरवालीमध्ये हल्ला घडवून आणता. संतोष देशमुख प्रकरणातही सह आरोपी होऊ दिले नाही. कुणबी नोंदी सापडलेल्या लोकांना देवेंद्र फडणवीस मुद्दाम व्हॅलिडिटी होऊ देत नाही. अधिकाऱ्यांना सांगून काहीतरी त्रुटी काढण्यास फडणवीस सांगत आहे, असे गंभीर आरोप मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री फडणवीसांवर केले.

# विमानतळ नको, जायकवाडीचे पाणी द्या

## १४० गावातील शेतकऱ्यांचा टाहो, तांदळा येथील उपोषणाला उत्स्फूर्त पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील १४० गावातील शेतकऱ्यांनी जायकवाडीच्या पाण्यासाठी लोकलढा उभारला असून या लोकलढा आंदोलनातून एक चळवळ निर्माण झाली आहे. जायकवाडीच्या पाण्यासाठी मौजे तांदळा ता.गेवराई येथे अजय पाटील साळुंखे आमरण उपोषणाला बसले असून दुष्काळी भागातील १४० गावातून उत्सुर्त



प्रतिसाद मिळत आहे. अजितदादा कामाचा माणूस आहे, दादा आम्हाला विमानतळ नको तर

▶▶ उर्वरित पान २ वर

**• लढा न्याय हक्काचा: अजय पाटील साळुंखे –** १४० गावातील शेतकऱ्यांनी जायकवाडीच्या पाण्यासाठी लोकलढा उभारला असून उपोषणकर्ते अजय पाटील साळुंखे म्हणाले की, १४० गावातील शेतकऱ्यांनी न्याय व हक्क मिळवून दिल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही.

**• पाण्यासाठी शेवटपर्यंत संघर्ष करू: गुळवे –** शिरूरपासून माजलगाव पर्यंतचे शेतकरी हक्काच्या पाण्यापासून वंचित आहेत. या शेतर्यांच्या शेतीला बारमाही व जायकवाडीचे पाणी मिळणे गरजेचे आहे. हे पाणी जो पर्यंत शेतीला मिळणार नाही, तो पर्यंत संघर्ष करू असे प्रतिपादन यावेळी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी केले.

# बीडच्या वंजारवाडी गावात श्रमदानात सहभागी न झालेल्या कुटुंबाला सरपंचाकडून मारहाण, दोन महिला जखमी

**बीड । प्रतिनिधी**

गावातील श्रमदानात सहभाग का घेतला नाही, असा जाब विचारत एका कुटुंबाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. ही घटना बीड तालुक्यातील वंजारवाडी गावात समोर आलीय. याप्रकरणी मारहाण झालेल्या कुटुंबाकडून देण्यात आलेल्या फिर्यादीनुसार सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड तालुक्यातील वंजारवाडी गाव आदर्श म्हणून ओळखले जाते. याच गावात श्रमदारातून झाडे लावण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला होता. या उपक्रमात विठ्ठल तांदळे यांचे कुटुंब सहभागी झाले नाही. दरम्यान याचाच राग मनात सरपंच वैजनाथ तांदळे याच्यासह इतर सहा जणांनी या कुटुंबातील तिघांना बेदम मारहाण केली. सध्या तांदळे कुटुंबावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून मारहाणीत दोन



महिलांचा समावेश आहे. बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# तिहेरी हत्याकांडात आईसह दोन निष्पाप बालकांना जिवंत जाळले



**• ओळख अद्यापही अज्ञात**

या तिघांची ओळख अद्याप पटलेली नाही. त्यामुळे पोलिसांनी परिसरातील हरवलेल्या व्यक्तींबाबतची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे. तसेच, घटनास्थळी मिळालेले पुरावे, सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक तपशील तपासण्यात येत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेची मदत घेऊन पोलिस या खूनामागील नेमकी कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न करत आहेत.

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रांजणगाव खंडाळे परिसरात घडलेली एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. एका आईसह दोन निष्पाप बालकांना पेट्रोल ओतून जिवंत जाळल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या अमानुष तिहेरी हत्याकांडामुळे संपूर्ण पुणे हादरून गेला असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आज रोजी खंडाळा माथ्याजवळ रांजणगाव गावचे हद्दीत एक महिला व तिचे दोन लहान मुलांना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचा खून करून त्यांना पेटवून दिलेले आहे. सदर महिलेचे वय अंदाजे २५ ते ३० वर्ष असून लहान मुलाचे वय अंदाजे चार वर्षे लहान बाळाचे वय ▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र हादरला! कोल्ड ड्रिंक्समध्ये औषध टाकलं, दारू पाजली..

# नराधमांनी MBBS विद्यार्थीनीसोबत केला गँगरेप

**सांगली । प्रतिनिधी**

जिल्ह्यात घडलेल्या गँगरेपच्या धक्कादायक घटनेमुळं संपूर्ण महाराष्ट्र हादरुन गेला आहे. येथील एका मेडिकल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीसोबत वर्गमित्रांनी आणि त्यांच्या एका मित्राने सामूहिक बलात्कार केला. पीडित आणि आरोपी एकाच मेडिकल कॉलेजमध्ये शिकतात. पोलिसांनी आरोपींच्या विरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमबीबीएस विद्यार्थीनीला तीन विद्यार्थी विनय विश्वेश पाटील (२२), सर्वज्ञ संतोष गायकवाड (२०) ▶▶ उर्वरित पान २ वर






# मान्सूनची राज्यात धडाकेबाज एन्ट्री

**• १२ दिवस आधीच देवगडमध्ये दाखल;**

**• महाराष्ट्र कधी व्यापणार?**

**मुंबई । प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यासाठी आणि बळीराजासाठी आनंदाची बातमी असून मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. तब्बल १२ दिवस आधीच मान्सून तळकोकणातील देवगडमध्ये दाखल झाल्याची घोषणा हवामान विभागानं केली आहे. महाराष्ट्रामध्ये साधारण ७ जूनला मान्सून दाखल होतो. मात्र यंदा वेळेच्या




आधीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला. दरम्यान, मुंबईतही लवकरच मान्सून दाखल होणार असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

नैऋत्य मान्सूनने भारतात एण्ट्री केली असून केरळ, कर्नाटकचा बहुतांश भाग, संपूर्ण गोवा ▶▶ उर्वरित पान २ वर

# प्रथमच मे महिन्यातच कपिलधारचा धबधबा झाला प्रवाहित

## बीड जिल्ह्यात आठ दिवसापासून मुसळधार पाऊस



**बीड । प्रतिनिधी**

गेल्या आठ दिवसात झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे बीड जिल्ह्यातील पर्यटन स्थळ असलेल्या कपिलधारचा धबधबा

▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवसैनिकांनो, तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल: ना. संजयजी शिरसाट

## मंत्री ना. संजयजी शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षात कधी जात पाहून काम केलं जात नाही व शिवसैनिक कधीच जात धर्म बघून जनतेचा कामासाठी पुढे जात नाहीत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे संस्कार आपल्यावर झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांची स्वाभिमानी विचारधारा घेऊन आपण सर्व शिवसैनिक पुढे वाटचाल करत आहोत. त्यामुळे शिवसैनिकांनी ▶▶ उर्वरित पान २ वर



**• शिवसेना नवनियुक्त पदाधिकारी**

अमोल दिगंबर जाधव – शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड ग्रामीण, संतोष किसनराव जाधव – शिवसेना तालुकाप्रमुख बीड तालुका, ज्ञानोबा जनार्धन गोंडे – शिवसेना तालुकाप्रमुख वडवणी तालुका, गजानन दामोदर कदम – शिवसेना शहरप्रमुख बीड शहर, हनुमंत काशिनाथ शिंदे – शिवसेना शहरप्रमुख वडवणी शहर, सुनील अंकुशराव गवते – जिल्हा सहसंघटकपबीड विधानसभा, केशव बाबुराव घिघे – जिल्हा सहसंघटक माजलगाव विधानसभा. नारायण आप्पासाहेब शिंदे–शिवसेना उपजिल्हाप्रमुख गेवराई, उध्दव ज्ञानेश्वर मडके – शिवसेना तालुकाप्रमुख गेवराई, नवनाथ राजेंद्र गवते – शिवसेना विधानसभा प्रमुख गेवराई, मुकेश अंकुशराव महाजन – शिवसेना शहरप्रमुख गेवराई, सुनिल मोटे –शिवसेना शहरसंघटक गेवराई या सर्व नवनिर्वाचित शिवसेना पदाधिकाऱ्यांना मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्रक देण्यात आले.

CMYK

# राज्यभरात पावसाचा हाहाकार! दोन जिल्ह्यांचा संपर्क तुटला, तर 'या' ठिकाणी ढगफुटी सदृश्यस्थिती



राज्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा आणि कोकणात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा तसेच पुणे शहर आणि पुणे जिल्ह्याला पावसाने चांगलंच झोडपून काढलं आहे. पुणे जिल्हातील काही भागांत पाणी साचलं असून दौड तालुक्यातील कुरकंभ येथे मोठ्या प्रमाणात नागरिकांना ट्राफिकचा सामना करावा लागत आहे. त्याचप्रमाणे पुणे –सोलापूर महामार्गावरील पाटस येथे ढगफुटी सदृश्यस्थिती निर्माण झाली आहे. याच परिस्थितीमुळे शेतीचे नुकसान झालेलं आहे. तसेच बीड आणि संभाजीनगर या दोन्ही जिल्ह्यांमधील संपर्क तुटला आहे. तर सिन्नर बस स्थानकाचा स्लॅब शिवशाही बसवर कोसळला आहे.

## साताऱ्यात पावसाचा हाहाकार

साताऱ्यात पावसाने थैमान घातलं आहे. फलटण तालुक्यातील धुमाळवाडी येथे पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे धुमाळवाडी गावाचा एकूण ३५ गावांशी संपर्क तुटला आहे. फळांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धुमाळवाडीवर मुसळधार पावसाचे संकट ओढावले आहे. दरम्यान, गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पश्चिम महाराष्ट्रातील साताऱ्यात पाऊस थांबायचं नाव घेत नाही. यामुळे कोयना धरणातील पाणी हे ओव्हफ्लो झाले आहे.

## पुणे जिल्ह्यात ढगसदृश्यस्थिती

साताऱ्यानंतर पुणे जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दौंड तालुक्यातील पाटसमध्ये ढगफुटी सदृश्यस्थिती निर्माण झाली आहे. तर कुरकुंभमध्ये मोठ्या प्रमाणात लोकांना ट्राफिकचा सामना करावा लागत आहे. तसेच या पावसामुळे काही छोटे पूल हे पाण्याखाली गेले आहेत. तसेच वाहत्या पाण्यामध्ये एक कार वाहून गेल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे.

## पालघरमध्येही पावसाचं थैमान

पालघरमध्ये मध्यरात्रीपासून पाऊस थांबायचं नाव घेत नाही. आज दिवसभर पावसाने पालघर जिल्ह्यामध्ये दमदार बॅटिंग केली आहे. यामुळे पालघरमध्ये काढणीसाठी आलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच पालघर जिल्ह्यात सर्वाधिक वीट भट्टींचे प्रमाण आहे. मात्र, या मान्सूनने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास पळवला आहे. त्यामुळे केवळ पालघरच नाहीतर राज्यातील बळीराजा सध्या चिंतेत आहे.

## बीड आणि संभाजीनगर जिल्ह्यांचा संपर्क तुटला

गेल्या आठ दिवसांपासून सुरु असणाऱ्या अवकाळी पावसाने बीडमधील पर्यटनस्थळ असणाऱ्या कपिलधारा धबधब्याच्या पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाहू लागला. दरम्यान, मुसळधार पावसाने बीड आणि संभाजीनगर या दोन जिल्ह्यांचा संपर्क तुटला आहे. बीड आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये जोडल्या जाणाऱ्या पुलाचे बांधकाम सुरु होते. मात्र, बांधकाम सुरु असणारा पूल कोसळल्याने आता नागरिकांना दहा किमी अंतर अधिकचा प्रवास करावा लागणार आहे. यामुळे बीड आणि छत्रपती संभाजीनगरचा संपर्क तुटल्याचं बोललं जात आहे.

## जनावरांचा कोठा गेला उडून

वाशीममध्ये पिंपळगावातील एका शेतकऱ्याच्या जनावरांचा कोठाच उडून गेला आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे. जनावरांसाठी साठवण्यात आलेला चारा पावसामुळे भिजून गेला आहे. काही शेतकऱ्यांचे गोठे कोसळल्याने जनावरांनाही दुखापत झाली असल्याचे सांगण्यात येत आहे.

## सिन्नर बसस्थानकाचा स्लॅब कोसळला

तर कोकणातील सिंधुदुर्गात मोठ्या प्रमाणात पावसाने हजेरी लावल्याने काढणीसाठी आलेल्या पिकांचे नुकसान झालं आहे. काही भागांमध्ये पावसाचे पाणी साठून पाण्याचे लोट वाहू लागले आहे. तसेच सिन्नर स्थानकाचा सहा नंबर प्लॅटफॉर्मचा स्लॅब शिवशाही बसवर कोसळला आहे. त्याचे काही व्हिडिओ आणि फोटो समोर आले आहेत. खबरदारी म्हणून बसस्थानक रिकामं करण्यात आले आहे. तसेच प्रवाशांना देखील बाहेर काढण्यात आले असून या घटनेमुळे सिन्नर शहरातील काही रस्ते बंद झाले असून, वाहतूक ठप्प झाली आहे.

पान १ वरून पुढे...

## विमानतळ नको...

जायकवाडीचे पाणी द्या, अशी मागणी अंदोलकांकडून करण्यात आली. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर अजय पाटील साळुंखे यांनी तांदळा येथे आमरण उपोषण सुरु केले आहे. यात प्रामुख्याने जायकवाडी धरणातून पाणी लिफ्ट करुन भगवान गडाच्या पायथ्याशी शिंगारवाडी फाट्याजवळ टाकण्यात यावे, राष्ट्रीय महामार्ग लगत कालवा करुन तांदळा, कोळगाव, मादळमोही, पाडळशिंगी, पाचेगाव, मार्गे कालवा तयार करावा, तसेच सिंदफना नदी पात्रात पाणी सोडावे, याचा फायदा १४० पेक्षा अधिक गावातील शेतकऱ्यांना होणार असून गेवराई, बीड, माजलगाव, शिरूर कासार (आष्टी)विधानसभा मतदारसंघातील कायम दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. सह, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावे, शेतकरी कर्ज माफी,पिक विमा अदी प्रश्नांवर आमरण उपोषण करण्यात आले आहे.यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, बप्पासाहेब अण्णा तळेकर, यशराज बदामराव पंडित, तालुकाध्यक्ष उद्धव मडके, लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, पत्रकार राहुल लोंढे, सरपंच नवनाथ गवते, सरपंच तुकाराम तळतकर, बाळासाहेब घाडगे,राजूभाऊ जहागिरदार, बालासाहेब शेरकर, तात्या नागरगोजे, गणेश हाडुळे, पत्रकार संतोष भारती, पत्रकार विनोद नरसाळे, अप्पासाहेब महानोर, आदीनाथ जोगदंड, काशीनाथ जोगदंड पाटील, शामराव घुगे, गणेश जाधव, दीपक जाधव, देविदास वाणी, केशव हाडुळे, ज्ञानेश्वर शेरकर, ओंकार शेंबडे, सह १४० गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मौजे तांदळा येथे आमरण उपोषणाला सुरुवात करण्यापूर्वी तांदळा गावातून टाळ मृदंगाच्या गजरात प्रभातफेरी काढण्यात आली.यावेळी हरि नामाचा गजर करण्यात आला.

## तिहेरी हत्याकांडात...

अंदाजे दीड वर्षे असे आहे. पुणे – अहिल्यानगर महामार्गालगत असलेल्या रांजणगाव खंडाळे परिसरात ही घटना घडली.

ग्रोवेल कंपनीच्या मागील बाजूस असलेल्या जागेत तीन जळालेल्या मृतदेह आढळले. सकाळी कामावर येणाऱ्या कंपनीच्या कामगारांना मृतदेह दिसताच त्यांनी तात्काळ पोलिसांना खबर दिली. रांजणगाव पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतले असून,

पान १ वरून पुढे...

शवविच्छेदनासाठी ते रुग्णालयात पाठवले आहेत.

प्राथमिक तपासानुसार, मृतांमध्ये एक महिला आणि दोन लहान मुले (एक मुलगा व एक मुलगी) यांचा समावेश आहे. या तिघांना अन्यत्रून येथे आणण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यांच्यावर पेट्रोल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, पावसामुळे आग पूर्णपणे न लागल्याने मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडले.

## महाराष्ट्र हादरला!....

आणि तन्मय सुकुमार पेडनेकर (२१) वानलेस्वाडी येथे राहणाऱ्या तिच्या मैत्रिणीच्या रुमवर घेऊन गेले. चित्रपट पाहण्याच्या बहाण्याने पीडितेला त्या ठिकाणी नेण्यात आलं.

रुममध्ये पोहोचल्यावर या नराधमांनी पीडितेला कोल्ड ड्रिंकमध्ये अंमली पदार्थ टाकून प्यायला दिलं. तिला दारुही पाजली..पीडिता जेव्हा बेशुद्ध झाली, तेव्हा तिघांनी मिळून तिच्यावर बलात्कार केला. काही वेळानंतर पीडित तरुणीला जाग आली, त्यानंतर तिने थेट विश्रामबाग पोलीस स्टेशन गाठलं आणि घडलेला संतापजनक प्रकार पोलिसांना सांगितला. पोलिसांनी तातडीनं कारवाई करत तीन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

पोलिसांच्या तपासात समोर आलं की, अटक केलेल्या आरोपींपैकी दोघे जण विनय आणि सर्वज्ञ पीडितेचे वर्गमित्र आहेत. तिसरा आरोपी तन्मय त्यांचा मित्र आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिन्ही आरोपींना कोर्टात हजर करण्यात आलं. त्यांना सहा दिवसांची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. या प्रकरणाबाबत लवकरच आरोपपत्र दाखल करून आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथेही फेब्रुवारी महिन्यात एका २२ वर्षीय तरुणीवर सामूहिक बलात्कार झाला होता. सहा नराधमांनी पीडितेवर दोनवेळा गँगरेप केला होता. त्यानंतर पीडितेला त्याच अवस्थेत सोडून आरोपी फरार झाले होते. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्दा दाखल करून कारवाई केली होती.

## मान्सूनची राज्यात...

आणि महाराष्ट्रातील तळकोकण व्यापला आहे. तळकोकणातील देवगडमध्ये मान्सून दाखल झाला असून पुढचे पाच दिवस रत्नागिरी आणि

पान १ वरून पुढे...

सिंधुदुर्गमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पुढच्या तीन दिवसात मान्सूनसाठी पूरक परिस्थिती असून महाराष्ट्राच्या अनेक भागात मान्सून दाखल होण्याची शक्यता मुंबईतील प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवली आहे. पुढच्या पाच दिवसांसाठी कोल्हापूर, कोकणामध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकणातील सिंधुद्रुग, रत्नागिरी, रायगडचा काही भाग, तर पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली–साताऱ्याच्या काही भागासाठी अलर्ट जारी करण्यात आला आहे.

कोकण–गोवा (दक्षिण) जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच दक्षिण मध्यम महाराष्ट्राच्या घाट भागांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर कोकण आणि उत्तर मध्यम महाराष्ट्रातील तुरळक ठिकाणी वादळ, विजांचा कडकडाट सुरू आहे. या परिसरात ४०–५० किमी प्रतितास वेगाने वाहणारे झंझावाती वारे आणि मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर मराठवाड्यातील काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## प्रथमच मे महिन्यातच...

प्रवाहित झाला आहे. विशेष म्हणजे प्रथमच मे महिन्यातच हा धबधबा प्रवाहित झाल्याचे दिसून आले. यंदा मे महिन्यात जिल्ह्यात ११९ मिलिमीटर पावसाची उच्चांकी नोंद झाली. शुक्रवारी रात्री २० मिमी पाऊस नोंदवला गेला आणि यामुळेच कपिलधार येतील दोन्ही धबधबे हे प्रवाहित झाले आहेत. शंभर फुटाहून धबधब्याचे पाणी पडत असून आता या ठिकाणी पर्यटकांनी गर्दी करायला सुरुवात केली आहे.

## शिवसैनिकांनो, तुम्ही...

जात–धर्म न बघता केवळ माणूस बघून सर्व सामान्य जनतेचे काम करा, जनतेच्या मनावर तुम्ही अधिराज्य गाजवाल आणि जनता तुम्हाला डोक्यावर घेऊन मिरवेल. तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल. असे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते संजयजी शिरसाट साहेब यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या आढावा बैठकीमध्ये शिवसैनिकांना संबोधित केले. तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत

पान १ वरून पुढे...

दिशा स्पष्ट केली. दि. २४ रोजी दुपारी २ : ०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. श्री. संजयजी शिरसाठ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेनेची अत्यंत महत्वपूर्ण आढावा बैठक मोठया उत्साहात संपन्न झाली. ही बैठक म्हणजे बीड जिल्ह्यात शिवसेना संघटनेच्या मजबुतीचा ठोस पुरावा ठरली. या बैठकीमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी मंत्री महोदय ना. शिरसाट साहेबांचे बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जंगी स्वागत करत मोठ्या थाटामाटात सत्कार केला. यानंतर मंत्री ना. शिरसाट साहेबांनी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना संबोधित केले. तसेच या बैठकीसाठी उपस्थित असणारे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत मार्गदर्शन केले. बैठकीचे प्रास्ताविक नवनिर्वाचित शिवसेना तालुकाप्रमुख संतोष जाधव यांनी केले तर बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या भाषानातून जिल्ह्याचा आढावा मांडला.

दरम्यान बैठकीत मंत्री महोदय ना. शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या महिला आघाडी अध्यक्षा जयश्रीताई वाघमारे व बाळासाहेब खेडकर तंटामुक्ती अध्यक्ष खामगाव गेवराई यांनी मंत्री महोदय शिरसाट यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहिर, महिला आघाडीच्या सह संपर्कप्रमुख अलकाताई डावकर, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, युवा सेनेचे गणेश शिराळे, ओबीसी वी जयंती सेनेचे जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी–माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आढावा बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले.

पान ४ वरून पुढे...

## मोहखेडमध्ये गुणवंतांचा....

दरवर्षी इयत्ता १० वी, १२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले तर अध्यक्षस्थानी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष संदीप उपरे असणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून धारुरचे तहसीलदार श्रीकांत निळे, पोलीस निरीक्षक आनंत जाधव, उपप्राचार्य रमेश सोनटक्के, प्रा.रमेश सोनवळकर, डॉ.किरण चक्रे, वंचितचे उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे, वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, धम्मपाल उघडे, ॲड.राजेश शिंदे, डीपीआय जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे, मुख्याध्यापक संदिप कापसे, ॲड.तेजस वडमारे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे. असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

## युवासेना कार्याध्यक्ष....

बाजीराव (दादा) चव्हाण तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे युवा नेते सुरज चुंगडे, मा. युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, मा युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, तसेच सर्व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते.

## वडवणी तालुका....

आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर नियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा. या बाबत मा.श्री. एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात पोलिस स्टेशन मध्ये निवेदने दिली जात आहेत.

वरील विषयी विनंती की, संजय सुर्यवंशी दैनिक देशोन्नती तालुका प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष यांना दिनांक २२ मे २०२५ रोजी निवधा तळणी सर्कल मधील २५ गावे २५ तासांपासून अंधारात या मथळ्या खाली वृत्त प्रकाशित केले वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही तरी सुध्दा कोणाच्यातरी चुकीच्या व्यक्तीच्या गैरसमज करून देण्याच्या प्रकारातून दि. २२/०५/२०२५ रोजी सकाळी ठिक: ०९:२५ वा. ९८२२२१०००३ या नंबर वरून ७ वेळा तर रात्री ०८:४४ वा. ९४२०४१५९२१ या नंबर वरून भडव्या, हरामखोरा, मादरचौद चुकीच्या बातम्या छापतोस का असे म्हणत संज्या तुला संपुन टाकेल अशा आर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली.

लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ असलेल्या पत्रकारास जिवे मारण्याची धमकी देवून संपवण्याची भाषा करणाऱ्या आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी वडवणी पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या निवेदनाद्वारे डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे,तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे सचिव महेश सदरे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष ओमप्रकाश साबळे, उपाध्यक्ष धम्मपाल डावरे, कोषाध्यक्ष वाजेद पठाण, पत्रकार गितांजली लव्हाळे, पत्रकार विजय राऊत, पत्रकार अतुल जाधव, पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार हरी पवार सह आदींनी केली आहे.

## जमिया दाउतुल...

कामाचा आढावा सांगितला व येणाऱ्या काळात काय करता येईल यावर भाष्य केले.अजमेर मणियार यांनी आपल्या भाषणात शहरातील उर्दू मदरसा मध्ये आज एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि डिजिटल साक्षरतेसाठी शाळेत नव्या कॉम्प्युटर लॅबची स्थापना करून विद्यार्थ्यांना संगणकांचे वाटप करण्यात आले. असे आपल्या भाषणात सांगितले.अरबाज भाई पठाण यांनी आपल्या भाषणात सविस्तर पणे सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठाच्या माध्यमातून शेवटच्या घटकांन पर्यत काम करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.सर्व जाती धर्माला घेऊन आपण समाजातील वंचित घटकाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू शिक्षण व आरोग्य आपण यावर काम करणार आहोत असे सांगितले.अध्यक्षीय भाषणात मोईन मास्टर यांनी सप्तरंग प्रतिष्ठान करत असलेले कामाचे भरभरून कौतुक केले.येणाऱ्या काळात सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठाच्या सोबत काम करण्यासाठी सर्वात पुढे असेल असे आश्वासन दिले.यावेळी उपस्थित सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान वडवणीचे नगरसेवक तथा गटनेते अस्लम कुरेशी,नगरसेवक इलीयास मेंबर ,मुस्तकीम शेख, बरकत लाला पठाण, बागवान सर,अजीम शेख,अखिल सय्यद,बालेपीर येथील आबेद शेख,निसार शेख, फेरोज शेख(आर.के.भाऊ)अमन शेख,लेखक नदीम शेख,वसीम मणियार औरंगाबाद, साजेद पाशा नेकनुर,सर्फराज शेख शिरूर,साबेर पटेल,नदीम पटेल,साहिल मणियार,फेरोज मणियार मौलाना इलीयास,मौलाना अब्दुल रहिम,मौलाना मोनिन हादी,मौलाना नविद व सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान चे सदस्य उपस्थित होते.

## मिनाक्षी देवकते...

विविध सामाजिक कार्यात सक्रीय आहेत. महिलांसाठी त्या कराटे, लाटी–काटी प्रशिक्षण देत आहेत. मेंढपाळ बांधवांना त्या नेहमीच मदत करत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाराष्ट्र अहिल्या रत्न पुरस्कार त्यांना देण्यात आला. या पुरस्काराचे वितरण रविवार २५ मे रोजी सोलापूर येथील निर्मिती लॉन्स येथे मोठ्या थाटात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार प्रकाश आण्णा शेंडगे हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्याते यशपाल भिंगे, अशोक गोरड, निमीषा वाघमोडे, डॉ. सचिन मोटे आदींची उपस्थिती होती. मिनाक्षी देवकते यांचा अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मान झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# भविष्यकाळात गणेश उगले यांच्या राजकीय जडणघडणीत मी सदैव पाठीशी राहील: ना. संजय शिरसाट

**बीड । प्रतिनिधी**

गणेश उगले हे गेल्या अनेक वर्षापासून शिवसेनेमध्ये निष्ठेने काम करत आहेत.. रोज सामाजिक कामामध्ये व्यस्त राहून लोकांच्या आणि अडचणीत धावणारा हा कार्यकर्ता आहे. ग्रामीण भागामध्ये त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून अनेक माणसे जोडले आहेत. त्यांना पक्षाने मार्केट कमिटीचे संचालक केले आहे आणि उपजिल्हाप्रमुखांची जबाबदारी दिली आहे.. पण भविष्यामध्ये त्यांना मोठी जबाबदारी मिळो आणि लोकांच्या सेवेसाठी सत्तेतले पद मिळो यासाठी मी सदैव शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले यांच्या पाठीशी राहील अशा शुभेच्छा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेनेचे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संजय शिरसाट साहेब यांनी दिनांक २४ मे च्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यामधील गणेश उगले यांच्या बीड येथील शिवगड निवासस्थानी दिलेल्या सदिच्छा भेटी प्रसंगी दिल्या. गणेश उगले यांचा मुलगा विश्वजीत यांच्या नुकत्याच १३ मे रोजी संपन्न झालेल्या विवाह व हळदी समारंभास उपस्थित राहून न शकल्याने आज २४ मे रोजी शासकीय दौऱ्यावर असताना त्यांच्या बीड येथील शिवगड निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या सदिच्छा भेटी प्रसंगी नामदार संजयजी शिरसाट साहेब यांच्या समवेत शिवसेना संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, मराठवाडा सचिव अशोकराव पटवर्धन साहेब, युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, मा. जिल्हाप्रमुख अँड .चंद्रकांत आप्पा नवले यांच्यासह सर्व तालुका शहर व जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष व उद्योजक हरिदास भाऊ जोगदंड , उद्योजक प्रशांत जोशी मनसे जिल्हा सचिव छत्रपती संभाजी नगर,शिवसेना गेवराई विधानसभा प्रमुख रमेश कानडे, शिक्षक नेते सुनील कुर्लेकर सर, गणेश राव तोडेकर, अनुरथ भाऊ मस्के, शिक्षक नेते जीवन बागलाने सर, तालुकाप्रमुख बाळासाहेब काळे, भगवान मस्के, अशोक मस्के, मराठा महासंघाचे भागवत मस्के, कॉन्ट्रॅक्टर संदीप नवले, धर्मराज आंधळे, वैजनाथ निर्मळ, गोरख बांडे, स्वप्निल आबूज, सुरज उगले, लक्ष्मण घोलप, प्रवीण उंदरे, राजेंद्र देवतर्शे, बालाजी गवते, बाबुराव जाधव, शहादेव धापसे, विनोद उगले, स्वामी काका, कुलकर्णी काका, प्रताप खांडे, शंकर कानडे, करण कानडे, ऋषी काळे, यांच्यासह शेकडो शिवसैनिक व मित्रपरिवार उपस्थित होते.



# मस्साजोगची नदी पाण्याने खचाखच भरली: नामच्या मोफत कामाचे कौतुक

**बीड । प्रतिनिधी**

नाम फाउंडेशन मार्फत मोफत मशीन आणि मोफत डिझेल देऊन येथील जवळपास तीन किलोमीटर अंतरावरील नदीमध्ये खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले. मे महिन्यात आलेल्या अवकाळी पावसाने ही नदी खचाखच भरली असून परिसरातील गावातील शेतकऱ्यांनी नामचे कौतुक केले आहे. आज जनआंदोलनाचे विश्वस्त अॅड. अजित एम. देशमुख यांनी या साठलेल्या पाण्याची पाहणी केली. सलग तीन किलोमीटर पाणी साठणार असल्याने आता या गावातील शेतकऱ्यांना फार मोठी ऊर्जा मिळाली आहे. शेतकऱ्यांना दोन पिके बिनधास्त घेता येतील आणि प्रत्येक वर्षी या पाण्याचा फायदा घेता येईल. दोन दिवसात झालेल्या पावसाने अनेकांच्या विहिरीत पाणी आले असून अनेकांची बंद पडलेले पाण्याचे बोअर देखील चालू झाले आहेत, असेही ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

नदीत साठलेले पाणी पाहण्यासाठी शेतकऱ्यांचा ओढा वाढला असून एक वेगळा आनंद परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. त्यामुळे नाम फाउंडेशनच्या कामाचे अनेक जण कौतुक करत आहेत.

या गावातून जाणारी नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम गेल्या दीड महिन्यापूर्वी नामने हाती घेतले होते. आणखी काही दिवस काम चालले असते. परंतु दररोज पडत असलेल्या पावसामुळे मशीन चांगल्या पद्धतीने काम करू शकत नव्हती. त्यामुळे आणि ठरल्याप्रमाणे सर्व काम पूर्ण झाल्यामुळे नामच्या कामाला यश आले आहे. या कामावर अॅड. अजित देशमुख यांनी सातत्याने लक्ष दिले. आणि काम चांगले व्हावे यासाठी प्रयत्न केले. पाणी अडवण्यासाठी नदीचे रुंदीकरण शक्य तेवढे मोठ्या प्रमाणात करण्यात आले असून खोलीकरणात देखील काही ठिकाणी पंधरा फूट पाणी साठले आहे. आणखी पाणी साठण्याची मोठी क्षमता त्या ठिकाणी आहे. त्यामुळे पाणीसाठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला आहे. या पाहणीच्या वेळी भागवत कदम, तुषार देशमुख, मंगेश देशमुख, मोरे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.



# मौजे शिरापूर धुमाळ येथे नारायण गडाचे काल्याचे किर्तन सोहळ्याला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती

## ▶ माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले तर जीवन जगणे अतिशय सुंदर होईल.. हरिभक्त परायण संभाजी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

जीवन जगत असताना प्रत्येक माणसाने सर्व माझे बांधव आहेत याप्रमाणेच राहिले पाहिजे अशाने गावाचा तालुक्याचा जिल्ह्याचा व देशाचा विकास होईल अशा स्वरूपाचे मार्गदर्शन हरिभक्त परायण संभाजी महाराज यांनी गुरुवर्य श्री शिवाजी बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे शिरापूर धुमाळ येथील काल्याच्या कीर्तनाला उपस्थिती राहून सर्व समाजांना संबोधित केले.

काल्याच्या कीर्तनात मराठा संघर्ष योद्धा माननीय श्री मनोज दादा जरांगे पाटील यांनी देखील फोन द्वारे संपर्क करून शुभेच्छा दिल्या. यावेळी हरिभक्त परायण लक्ष्मण महाराज तकिक, रामहरी रसाळ गुरुजी, व्यंकटेश कुलकर्णी, एडवोकेट अभिषेक बहिर, संजय बहिर, ज्ञानेश्वर बहिर, राहुल बहिर, अंगद बहिर, असे गावातील असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.





*हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, तसेच शिवसेना पक्षप्रमुख प्रमुख मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व संसद रत्न खासदार श्री.श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा.ना.श्री. संजयजी शिरसाट साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, युवासेना मराठवाडा निरीक्षक श्री. बाजीराव चव्हाण, व बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या उपस्थिती मध्ये वडवणी शिवसेना शहर प्रमुखपदी हनुमंत जिजा शिंदे यांची निवड करण्यात आली व वरील मान्यवराच्या हस्ते काल दि. २५/०५/२०२५ रविवार रोजी नियुक्तीपत्र देऊन अधिकृत घोषणा करण्यात आली. (छाया- संभाजी लांडे पाटील)*

# महिलेस मारहाण व शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या बाबत आरोपींची निर्दोष मुक्तता : अॅड. युवराज शेळके

**बीड । प्रतिनिधी**

महिलेस मारहाण व शिवीगाळ करून जीवे मारण्याचा धमक्या दिल्या प्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातून आरोपींची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

सविस्तर असे की, पिडीत महिलेने दिनांक २६/०५/२०१९ रोजी नेकनूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १७९/२०१९ कलम ३२४,३२३,५०४,५०६ व ३४ भादवी नुसार फिर्याद दिली होती की, सदर महिला पाटोदा बेलखंडी ता. जि. बीड येथील जनावरांच्या चारा छावणीवर चारा आणण्यासाठी गेली असता,चारा आणण्यासाठी का आली? असे म्हणून आरोपीं नामे बंडू उर्फ विकास विष्णू सवासे याने लाथाबुक्याने मारहाण केली व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या बाबत व आरोपी नामे चंद्रसेन बापू माने व विष्णू कारभारी सवासे यांनी दारू पिऊन शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. त्याअनुषंगाने तपासी अंमलदार नेकनूर पोलीस स्टेशन यांनी १२ साक्षीदारांचे जबाब नोंदवून न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले.आरोपीच्या विरुद्ध नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक २७७/२०१९ नुसार खटला चालवण्यात आला. या खटल्यामध्ये साक्षीपुरावा होऊन प्रत्यक्षदर्शनी साक्षीदारांचा जबाब नोंदवण्यात आला. परंतु आरोपीच्या वतीने घेण्यात आलेल्या बचावाला ग्राह्य धरून मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब,ए.एम पाटील यांनी तिन्ही आरोपींची सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाकडे बीड तालुक्यातील पाटोदा बेलखंडी परिसरातील लोकांचे लक्ष लागून होते. आरोपींच्या वतीने अॅड. युवराज शेळके यांनी महत्त्वपूर्ण बाजू मांडली व त्यांना अॅड. श्रीराज शेळके यांनी सहकार्य केले.



# कृषिभूषण शिवराम घोडके यांचा मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र महा गौरव पुरस्काराने सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

प्रगतशील शेतकरी, सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचा प्रचार प्रसार करणारे तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शिवराम घोडके यांचा पुण्यात राज्याचे तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र महा गौरव पुरस्कार देवून समान्मानित करण्यात आले. यावेळी ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओम प्रकाश शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषिभूषण शिवराम घोडके यांना कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल महाराष्ट्र महा गौरव पुरस्कार २०२५ जाहिर झाला होता. या पुरस्काराचा वितरण सोहळा रविवार दि. २५ मे रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील जे डब्ल्यू मॅरिएट हॉटेल येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्र च्या वतीने महाराष्ट्र महा गौरव २०२५ राज्यस्तरीय पुरस्कारासाठी बीडचे प्रगतशील शेतकरी, सेंद्रिय नैसर्गिक शेतीचा देशभर प्रसार व प्रचार करणारे तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शिवराम घोडके यांची निवड करण्यात आली होती.

दैनिक मराठवाडा पत्र दि.२६/०५/२०२५

**टीसी हरवला आहे.**

परमेश्वर मच्छिंद्र शिंगटे या नावाचा इयत्ता १२ वी चा टी . सी . गेवराई ते बीड प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**संपर्क : मो. नं. ९६३७५६०४२६**

# श्री विनायकराव विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उज्ज्वल यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शनिवार दिनांक २४ रोजी श्री विनायकराव माध्यमिक विद्यालयात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक श्री. बांगर सर, मकाळ सर, कोचाळे सर, आजबे सर, वळे सर, जिरेकर सर, मोरे सर, श्रीमती.कवडे मॅडम, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील शिक्षण तज्ञ पालक आजी माजी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या



*बीड:सोनार समाज जिल्हाध्यक्ष श्री बाबा पंडीत यांना सोलापूर या ठिकाणी महाराष्ट्र राज्यस्तरीय संत शिरोमणी नरहरी महाराज समाजरत्न पुरस्कार २०२५ मिळाल्या बद्दल सत्कार करतांना ज्येष्ठ मार्गदर्शक शंकर तात्या जगताप, सुरेश तात्या शेटे, झुंजार धांडे, नितीनभैया धांडे, सोमनाथ धांडे, मधुकर धांडे, मुकुंद भालेकर, बाजीराव शिंदे, सरपंच भिकू शिंदे,बाबा पंडीत,चंद्रसेन मन्यारी, अंकुश आगळे, पिंटू ठोंबरे,गणेश तपासे,शरद ढाले,मोतीसिंग राजपूत,ओमप्रकाश कश्यप, सुंदर भोसले, विलास बारस्कर, अमोल कुमकर, नाथा तपासे,शिवाजी सुस्कर .*

# बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली; शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न

## मंत्री संजय शिरसाट यांनी तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून केला प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

नापाक पाकचे मनसुबे उद्धवस्त करणारे ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवणाऱ्या भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ काल शनिवार दि २४ मे २०२५ रोजी दु. १२: ०० वाजता महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न झाली. या तिरंगा रॅलीत बीडवासियांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तर या रॅलीत युवकांनी ट्रॅक्टरमध्ये सैनिकांची वेशभूषा परिधान करून आपले देशप्रेम व्यक्त केले. याबरोबरच असंख्य तरुण हाती तिरंगा झेंडा घेऊन भर पावसात भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणा देत मोटारसायकलवर स्वार झाले. मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांनी सर्वोप्रथम विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. यानंतर लागलीच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह तिरंगा रॅलीत सहभागी झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत ही भव्य रॅली काढण्यात आली. याप्रसंगी शिवसेना विभागीय सचिव अशोकपटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पूसाहेब मोरे, माझे सहकारी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, युवासेनेचे बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, अविनाश जाधव, सागर बहिर, अलकाताई डावकर, चंद्रकलाताई बांगर, रविराज बडे, सुजित शिंदे, गणेश शिराळे, मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, एसटी कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
सोमवार, दि.२६ मे २०२५
पान ४

## मोहखेडमध्ये गुणवंतांचा गुणगौरव; उपस्थित राहण्याचे संयोजन समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

चला विद्यार्थी घडवूया, या टॅगलाईनखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा गुणगौरव सोहळा धारुर तालुक्यात येत असलेल्या मोहखेड येथे गुरुवार (दि.२९) मे रोजी सकाळी १० वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ यांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, त्यांना त्यांच्या यशाचा योग्य मार्ग कळावा. यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर



# 'माय छोटा स्कूल' म्हणजे जगाच्या स्पर्धेत मुलांना यशस्वी होण्याचं बाळकडू देणारी शाळा : ना. संजय शिरसाट

### बाळासाहेब पिंगळे यांची संकल्पना नव्या पिढीला दिशा देणारी, पालकांनी या संधीचे सोने करावे

**बीड । प्रतिनिधी**

आज जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरू आहे. प्रत्येक क्षेत्रात रोज नवनवी क्रांती होत आहे. त्याच धर्तीवर शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडत आहेत. आपली मुलं जागतिक स्पर्धेत टिकवून रहावीत असे वाटत असेल तर त्या दृष्टीने पालकांना तयारी करावी लागते. पिंगळे सरांच्या संकल्पनेतून साकारलेली माय छोटा स्कूल ही शाळा नव्या पिढीला दिशा देणारी आहे. कारण मुलांच्या बौद्धिक विकासासाठी २ ते १० वर्ष हे वय चांगले मानले जाते. अगदी त्याच वयात मुलांवर योग्य संस्कार करून त्यांना आनंदी वातावरणात शिक्षणाची गोडी लावणारी ही शाळा म्हणजे जागतिक स्पर्धेत टिकवून ठेवणारे बाळकडू म्हटले तर वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजयजी शिरसाठ यांनी केले. शिवसेनेचे



माजी जिल्हाप्रमुख बाळासाहेब पिंगळे यांनी बीड शहरात नव्याने सुरू केलेल्या माय छोटा स्कूल या शाळेला ना. शिरसाठ यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेचे कौतुक करताना बोलत होते. यावेळी पटवर्धन साहेब जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळुक, स्वप्निल गलधर, बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, सागर बहीर, चंद्रकांत नवले स्कूलचा प्राचार्या पुजा, मोनिका यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना ना. शिरसाठ म्हणाले की, देशातील २२०० पेक्षा जास्त शाळांचा हा ब्रँड असून मुलांना जागतिक दर्जाचे शिक्षण देणारी, वल्ड रेकोर्ड पुरस्कार मिळवलेली, डोनेशन आणि ॲडमिशन फिस शून्य असलेली ही शाळा आहे. मुलांच्या बौद्धिक विकासाच्या काळात हसत खेळत, आनंददायी वातावरणात त्यांच्यावर होणारे संस्कार आणि लागणारी शिक्षणाची गोडी ही विद्यार्थ्यांमध्ये पुढे येणारा न्यूनगंड काढून टाकणारी ठरणार आहे. जगात कुठलीच गोष्ट अवघड नाही. फक्त त्यासाठी योग्य नियोजन, तयारी आणि सराव असणे गरजेचे आहे. मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ही शाळा एक वरदान ठरेल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

### ▶ सुसज्ज इमारत, डिजिटल क्लासरूम पाहून सर्वच भारावले

**सीबीएसई बेस असलेल्या या शाळेत प्रशिक्षित शिक्षक वर्ग, बाल संस्कार वर्ग, डान्स, ड्रामा आणि गेम झोन, ब्रेन डेव्हलपमेंट क्लासेस आणि मोफत हॅपिनेस प्रोग्राम सारख्या सुविधा मिळत आहेत. तसेच शाळेची सुसज्ज इमारत व डिजिटल क्लासरुम पाहून सर्वच जण भारावले, तसेच मंत्री शिरसाट यांनी सर्वांचे कौतुक करून बाळासाहेब पिंगळे यांना शुभेच्छा दिल्या.**

## पत्रकारांना धमकी देणाऱ्या आ.बाबुराव कदमांवर गुन्हा दाखल करा : जिल्हाध्यक्ष अशोक होळकर

### अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने जाहीर निषेध

**बीड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणाऱ्या आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक होळकर यांनी केली आहे, पत्रकारांवर दबाव टाकून आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या आमदारांचा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ बीड शाखेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे.



दैनिक देशोन्नती तालुका प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष यांना दिनांक २२ मे २०२५ रोजी निवधा तळणी सर्कल मधील २५ गावे २५ तासांपासून अंधारात या मथळ्या खाली वृत्त प्रकाशित केले वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही तरी सुद्धा पत्रकारांना संपविण्याची असंविधानिक भाषा वापरणाऱ्या आमदार कदमावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अशोक होळकर मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष अनिल देवा कुलकर्णी ,जिल्हा कार्याध्यक्ष दत्तात्रय नरनाळे, जिल्हा सचिव विठ्ठल घरत, प्रदीप आनेराव ,अस्लम पठाण ,सिध्दांत खवतड, अंकुश पवार,यांनी केली आहे.

## युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्या मार्फत बीडच्या चार निष्ठावंत युवासैनिकांना स्कॉर्पिओ गाडी भेट

### बाजीराव चव्हाण यांच्या चार निष्ठावंत युवासेना पदाधिकाऱ्यांना स्कॉर्पिओ गाडीचे गिफ्ट

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या कार्याला प्रेरित होऊन महाराष्ट्रातील युवा मोठ्या प्रमाणात युवा सेनेत दाखल होताना दिसून येत आहेत. युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मराठवाड्यात वाढत असलेला युवा सेनेचा विस्तार युवकांसाठी आज प्रेरणा देणारा आहे. मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड जिल्हात युवासेनेचा आवाका वाढत चालला आहे. याच कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड मधील युवा सैनिकांनी युवा सेना वाढवण्यासाठी बाजीराव चव्हाण यांच्या खांद्याला खांदा लावून युवासेना वाढवली. आज बाजीराव चव्हाण यांच्या



तालमीत वाढलेले मेहनती एकनिष्ठ असलेले चार युवासैनिक यांचे चांगले कार्यपाहून त्यांना युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्यामार्फत चार स्कॉर्पिओ गाड्या भेट देण्यात आल्या आहेत. गाड्या भेट देताना प्रमुख उपस्थितीत राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाट साहेब, हर्षदाताई सिरसाट, तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण साहेब, यांच्या उपस्थितीत बीडच्या चार निष्ठावंत कार्यकर्त्यांना स्कॉर्पिओ गाड्या आज भेट देण्यात आल्या आहेत. यावेळी उपस्थित युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत ▶▶ उर्वरित पान २ वर

## वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलिस स्टेशनला निवेदन

### आ.बाबुराव कदमांवर गुन्हा दाखल करा



**वडवणी । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणारे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर नियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा. अशा मागणीचे निवेदन वडवणी पोलिस स्टेशन मध्ये देण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणारे ▶▶ उर्वरित पान २ वर

## जमिया दाउतुल इमान मदरसा बालेपीर येथे आधुनिक तंत्रज्ञानाची भर विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्युटरचे वाटप

### उर्दू मदरसा डिजिटल शिक्षणाची नांदी:अरबाज पठाण

**बीड । प्रतिनिधी**

जमिया दाउतुल इमान मदरसा बालेपीर येथे स्थानिक विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरचे वाटप करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने ही महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मतीन भाई सय्यद, अन्वर भाई सय्यद, मोईन मास्टर, व सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठाचे सर्व पदाधिकारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांना संगणक



शिक्षण आणि विविध उपयुक्त शैक्षणिक साधनांचा लाभ घेता येणार आहे.या उपक्रमामुळे उर्दू मदरसा येथे शिक्षणाची गुणवत्ता वाढण्यास मदत होणार असून, विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठीही हे सहाय्यक ठरणार आहे.सप्तरंग प्रतिष्ठान कडून अलीम भाई सय्यद यांनी आपल्या भाषणात सप्तरंग प्रतिष्ठान दोन महिन्यांत केलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर


## सामाजिक न्याय मंत्री मा.ना. संजयजी शिरसाट यांची संगिताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी भेट



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या दौऱ्यावर आलेले सामाजिक न्याय मंत्री मा.ना. श्री.संजयजी शिरसाट यांनी संगिताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. दि.६ रोजी अहिल्यानगर – पुणे महामार्गावर झालेल्या अपघातात जखमी झालेल्या शिवसेनेच्या मराठवाडा संपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य अँड. संगीताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी सामाजिक न्याय मंत्री मा.ना.श्री.संजयजी शिरसाट यांनी भेट घेऊन तब्येतीविषयी विचारपूस केली. अपघातामध्ये जखमी झालेल्या शिवसेना उपजिल्हाप्रमुख शेख फर्जाना, विशाल गणोरकर यांच्या दुखापतीची माहिती यावेळी मंत्री महोदयांनी आत्मियतेने घेतली. या भेटीच्यावेळी शिवसेनेचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर हे उपस्थित होते.

## मिनाक्षी देवकते यांचा अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

येथील बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मिनाक्षी देवकते / डोमाळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे, व्याख्याते यशपाल भिंगे यांच्या हस्ते सोलापुरात महाराष्ट्र अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बीड येथील बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मिनाक्षी देवकते / डोमाळे या ▶▶ उर्वरित पान २ वर

# नेकनूर परिसरातील कांद्याची अवकाळीने नासाडी अनेक गावे कांदा उत्पादक, हजारोचा खर्च पाण्यात



**नेकनूर । प्रतिनिधी**

आठवडाभरापासून मुक्कामी असलेल्या अवकाळीने नेकनूर परिसरातील कांदा उत्पादक गावांना मोठा फटका बसला आहे .काढणीला नेकनुरसह परिसरातील अनेक गावे कांदा उत्पादक म्हणून ओळखले जातात बारा महिने कांद्याचे पीक घेणारे काही शेतकरी या भागात असून उन्हाळी कांदा टिकाऊ असल्याने याच्या उत्पादनाकडे मोठ्या प्रमाणात परिसरातील शेतकरी वळले असताना यावर्षी मे मध्ये अवकाळी ने मोठा मुक्काम ठोकल्याने काढनीला आलेला शेकडो हेक्टर क्षेत्रातील कांदा नासून खराब झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असून मेहनती सोबत केलेला खर्चही पाण्यात गेल्याने शेतकऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**● मागील आठ दिवसांपासून सलग पाऊस सुरू आहे. त्यामुळे माझ्या शेतात काढणीला आलेल्या दोन एकर कांद्याची नासाडी झाली असून अशीच परिस्थिती अनेक शेतकऱ्यांची आहे यामुळे मोठे नुकसान झाले. उत्पन्न तर सोडा खर्चही वाया गेला आहे. –प्रल्हाद शिंदे, शेतकरी नेकनूर**

**●नेकनूरसह परिसरात आठवड्यापासून मुक्कामी असलेल्या अवकाळी पावसामुळे कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर आंबे, पपई यांनाही फटका बसला आहे.सरकारने केवळ आश्वासन न देता नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत देण्याची गरज आहे.**

